**१०० कोटी वृक्षलागवडीचे**
**उद्दीष्ट साध्य करणे.**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक एफडीएम-२०११/प्र.क्र.१०४/फ-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - २५ ऑक्टोबर,२०११.

**शासन परिपत्रक -** मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय विकास परिषदेत, महाराष्ट्र राज्य सन २०१२-१७ या पंचवार्षिक कालावधीत ५०० कोटी वृक्ष लागवड करणार असल्याचे जाहीर केलेले आहे. हे उद्दिष्ट शासनाच्या विभिन्न विभाग, कृषी विभाग, वन विभाग, जलसंधारण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग, ग्रामीण विकास विभाग, उद्योग विभाग, जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम इत्यादी विभाग आणि खाजगी उद्योजक, शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था व स्वयंसेवी संस्था यांच्या सहाय्याने संयुक्तपणे राबविण्याचे ठरविलेले आहे. सन २०१२ चे पावसाळ्यात वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट एकूण १०० कोटी निर्धारित करण्यात आले असून, त्याचा जिल्हानिहाय तपशील सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये जोडण्यात आला आहे. यामध्ये जिल्हा परिषद, कृषी व शिक्षण सह उद्दिष्ट स्वतंत्र दर्शविले असून, उर्वरित विभागाचे एकत्रित उद्दिष्ट नमूद करण्यात आले आहे. याकरिता सविस्तर सूचना, विभागनिहाय उद्दिष्ट, रोपांचे नियोजन, वृक्ष लागवडीचे नियंत्रण याविषयीच्या मासिक प्रगतीचा आढावा, जिल्हा / विभागीय / राज्य स्तरावर समन्वय करण्याच्या कार्यपध्दतीबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

**वन विभाग.**

वन विभागाकडे सन २०१२-१३ या वर्षाकरिता १६ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. १६ कोटींचे वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट खालीलप्रमाणे कार्यक्रम निहाय अंमलात आणण्यात येत असल्याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख, महाराष्ट्र राज्य यांनी खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

| योजनेचे नांव | रोपवन क्षेत्र (हेक्टर) | नैसर्गिक पुनर्निमिती क्षेत्र (हेक्टर) | निधी (रुपये कोटीत) | एकूण क्षेत्र (हेक्टर) | रोपांची संख्या (कोटीत) |
|---|---|---|---|---|---|
| योजना | ८३०० | ४०००० | ९.६८ | ४८३०० | ०.८३ |
| योजनेत्तर | ३००० | ४०००० | ९.६८ | ४३००० | ०.३० |
| १३ वा वित्त आयोग | ३३०० | ५००० | १.५० | ८३०० | ०.३३ |
| राज्य वन विकास यंत्रणा | ३९०० | ५००० | ६.०० | ८९०० | ०.४९ |
| कॅम्पा | १०००० | ०० | ०० | १०००० | १.०० |
| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम | ४३५०० | ६०००० | ७२.०० | १०३५०० | ७.०५ |
| त्रिपक्षीय करार | २५००० | -- | -- | -- | -- |
| इतर | ३००० | ०० | ०० | ३००० | ६.०० |
| एकूण | १००००० | १५०००० | ९८.८६ | २२५००० | १६.०० |

मुख्य सचिव या कामाचा आढावा दर महिन्याला व्हिडीओ कॉन्फरन्समार्फत घेतील.

वन विभागाला हे उद्दिष्ट गाठण्याकरिता आदिवासी उपयोजना व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम यामध्ये धोरणात्मक व वित्तीय सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

**वृक्ष लागवडीकरिता करावयाची रोपांची उपलब्धता. :-**

विद्यमान कार्यप्रणाली विचारात घेता, वन विभागाकडे १०० कोटी रोपे रोपे उपलब्ध होणार नाहीत, असे स्पष्ट चित्र दिसून येते. यास्तव, वन विकास महामंडळ, वन विभाग आणि सामाजिक वनीकरण विभागामार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना हाती घेण्यात येतील.

(i) किसान रोपवाटिकांच्या धर्तीवर मोठ्या प्रमाणावर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम आणि आदिवासी उपयोजनांमधून जिल्हानिहाय किसान रोपवाटिका घेण्यात याव्यात. कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविला जाईल.

(ii) महाराष्ट्र वन विकास महामंडळाची स्वत:चे वनीकरण उद्दिष्ट पूर्ण करुन ८० लक्ष अतिरिक्त रोपे निर्माण करण्याची क्षमता आहे. त्यांचेकडे त्याप्रमाणे अन्य तंत्रज्ञान देखील विकसित करण्यात आलेले आहे. यास्तव, शासनाच्या सर्व विभागांनी त्यांना लागणाऱ्या रोपांची मागणी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर यांच्याकडे दिनांक ३० नोव्हेंबर,२०११ पर्यंत नोंदविणे आवश्यक राहील.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी आंध्र प्रदेश, गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश, छत्तीसगड या शेजारच्या राज्यांकडून रोपांचा तुटवडा भरुन काढण्याकरिता त्या राज्यांना भेटी देवून तेथील रोपे, दर, कार्यपध्दती यांचा सविस्तर प्रस्ताव एक महिन्यात देतील व त्याप्रमाणे वेगवेगळे विभाग आणि वन विभाग यांचे स्तरावर रोपे मागणी पुरवठ्याबाबत आवश्यक कार्यवाही करतील.

**सामाजिक वनीकरण विभाग.**

सामाजिक वनीकरण विभागाची राज्य पातळीवर सन २०१२-१३ मध्ये ४ कोटी रोपे आणि सन २०१३-१४ मध्ये ६ कोटी रोपांचा पुरवठा करण्याची क्षमता आहे. ग्राम विकास विभाग, कृषी विभाग, शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग इत्यादींनी ही बाब विचारात घेवून त्वरित आवश्यक असणाऱ्या रोपांची मागणी संबंधित प्रादेशिक मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण यांच्याकडे करतील. रोपे पुरवठ्याची मागणी करतेवेळी रोपाच्या अनुज्ञेय किंमतीचा भाग म्हणून ३० टक्के आगाऊ रक्कम जिल्ह्याचे उप-संचालक, सामाजिक वनीकरण यांच्याकडे अदा केल्यास, त्या विभागाची रोपांची मागणी सामाजिक वनीकरण विभागाकडून पक्की केली जाईल.

**सामाजिक वनीकरण विभागाचे वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट.**

सन २०११-१२ मध्ये या विभागाचे २ कोटी वृक्ष लागवडीचे नियोजन करण्यात आले असून, सन २०१२-१३ मध्ये ४ कोटी वृक्ष लागवड नियोजित आहे. सदर उद्दिष्ट पूर्णपणे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमाखाली पूर्ण करण्यात येईल. कार्यक्रमाचा जिल्हास्तरीय महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

आराखड्यात अंतर्भाव केला जाईल. त्याचप्रमाणे ही सर्व कामे कोणत्याही परिस्थितीत नोव्हेंबर-डिसेंबर,२०११ पावेतो प्रशासकीय मान्यता घेवून, त्याची अंमलबजावणी सुरु केली जाईल.

## कृषी विभाग

कृषी विभागाकडे पडिक जमिनीवर आणि शेतीच्या बांधावर वृक्षलागवड करणे, याची प्रामुख्याने जबाबदारी असेल. सदर लागवड कामे करण्याकरिता कृषी विभागाकडे असलेल्या सर्व कार्यरत योजना आणि खाजगी जमिनीवर फलोत्पादन व वृक्ष लागवड ही कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम, रोजगार हमी योजना निगडीत सध्याची मंजूर फळबाग लागवड योजनेप्रमाणे शिथील करण्यात येईल.

महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांच्याकडील उपलब्ध माहितीप्रमाणे कृषी विभागाकडे २५.६० लाख हेक्टर पडिक जमीन असून, त्यावर प्रति हेक्टर १०० वृक्षांची लागवड केल्यास, २५.६ कोटी वृक्ष लागवड करण्यास वाव आहे. त्याचप्रमाणे १७४.४२ कोटी हेक्टर बांधांवर प्रति हेक्टर २० झाडे लावल्यास, आणखी ३४.८४ कोटी वृक्ष लागवड होवू शकेल. कृषी विभागामार्फत पडिक जमिनीवर वृक्षारोपण आणि शेती बांधावरील वृक्ष लागवडीकरिता वेगळा शासन निर्णय जलसंधारण विभाग अल्पावधीतच निर्गमित करण्यात येईल. या पडिक जमिनीचा विचार करीत असतांना, आदिवासी समाजाला वन हक्क कायदा,२००६ मध्ये जवळपास १ लाख ५१ हजार एकर मिळालेल्या जमिनीपैकी नापिक जमिनीचा प्रामुख्याने विचार करता येईल. या जमिनीत साग, बांबू व तत्सम प्रजातींची रोजगार हमी योजनेखाली लागवड करण्यासाठी विचार करण्यात येईल. कृषी विभागाकडे असलेले कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक, मंडल कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी व जिल्हा कृषी अधिक्षक यांनी या कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी. वृक्ष लागवडीची उद्दिष्टे कृषी विभागाने रोजगार हमी योजना आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमामध्ये पूर्ण करण्यात यावीत.

## ग्राम विकास विभाग

राज्यामध्ये २७,९९३ ग्राम पंचायती असून, प्रत्येक ग्राम पंचायतीला किमान २० हजार वृक्ष लागवड करावयाचे उद्दिष्ट देण्यात येत आहे. ही वृक्ष लागवड ग्राम पंचायतीकडे उपलब्ध असलेला विकास निधी व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम यामधून करावयाची आहेत आणि तसा वेगळा शासन निर्णय जलसंधारण विभागामार्फत निर्गमित करण्यात येत आहे. या लागवडीकरिता रोपांची उपलब्धता ग्राम पंचायतीजवळ असलेल्या रोपवाटिका, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, सामाजिक वनीकरण विभाग व इतर सार्वजनिक व खाजगी स्त्रोतामधून करण्यात येईल.

## आदिवासी विकास विभाग

या सर्व कामांना पुरक म्हणून आदिवासी उप योजना अंतर्गत उपलब्ध होणारा निधी वापरण्यात येईल. पुरक योजनेचा वापर खालीलप्रमाणे नवीन योजना तयार करुन करण्यात यावा.

(अ) रोजगार हमी योजनेखाली घेतलेल्या वृक्ष लागवडीची देखभाल व पुढील विकास करण्यासाठी आदिवासी कुटूंब निहाय क्षेत्रावर वृक्ष लागवड संवर्धनाची लाभार्थ्यांची संमत्ती घेवून जबाबदारी टेवण्यात यावी.

(ब) ज्या आदिवासी गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे, त्या गावांमध्ये आदिवासी कुटूंबांना बायोगॅस किंवा स्वयंपाकाचा गॅस ३/४ अनुदान तत्वावर देण्यात यावा.

(क) शेतीसाठी सुधारित हत्यारे व संकरीत जनावरांसाठी चारा उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था पशुसंवर्धन विभागाने आदिवासी उप योजनेमधून आदिवासी कुटूंबासाठी तयार करण्यात यावी.

## शिक्षण विभाग

राज्यात एकूण ९२,३९२ शाळा असून, प्रत्येक शाळेला जर १०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट दिले तर ९२ लक्ष वृक्षांची लागवड शिक्षण विभाग करण्यास वाव आहे. याकरिता लागणाऱ्या रोपांचा पुरवठा सामाजिक वनीकरण विभागाच्या रोपवाटिका व मंजूर असलेली किसान रोपवाटिका यांच्याकडून उपलब्ध करुन देण्यात यावा. या रोपांकरिता आगावू रक्कम त्वरित अदा केल्यास, त्यांना हव्या असलेल्या रोपांची मागणी कायम करता येईल.

## उद्योग विभाग व वन विभाग यांनी संयुक्तपणे त्रिपक्षीय योजनेंतर्गत करावयाची वृक्ष लागवड.

१६,१४० उद्योगधंद्यांची नोंदणी महाराष्ट्रात आहे. प्रत्येक उद्योगाने ५ हजार झाडांचे उद्दिष्ट गाठले तर ८.७० कोटी वृक्ष लागवड करता येवू शकते. हे उद्दिष्ट पूर्ण करीत असताना जिल्ह्याचे व्यवस्थापकीय संचालक, जिल्हा उद्योग केंद्र व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी मुख्य वनसंरक्षक यांचेशी संपर्क साधून मोठ्या उद्योगांना सामाजिक जबाबदारी (Corporate Social Responsibility) या हेतूने उपलब्ध असलेल्या निकृष्ट दर्जाच्या वनांच्या जमिनींवर त्रिपक्षीय करार करुन वृक्ष लागवड करावयाचा शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही आयोजण्यात यावी. या कार्यवाहीचा आढावा जिल्हाधिकारी यांचे स्तरावर दरमहा वन विभाग, उद्योग विभाग यांच्या संयुक्त उपस्थितीत घेतला जाईल.

## सार्वजनिक बांधकाम विभाग.

महाराष्ट्रामध्ये २ लाख ४० हजार कि.मी. चे रस्ते असून, प्रत्येक कि.मी.ला १०० झाडे लावल्यास, २ कोटी ४० लाख वृक्ष लागवड करता येवू शकेल. या वृक्ष लागवडीकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाने महाराष्ट्र वन विकास महामंडळ, किसान रोपवाटिका आणि खाजगी रोपवाटिका यामध्ये असलेली रोपे उपलब्ध करुन घ्यावीत. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी अधिक्षक अभियंता मंडळ निहाय २ कोटी ४० लाखांचे वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट वाटप करावे. या वृक्ष लागवडीचा अहवाल मुख्य सचिव यांच्या दरमहा आढावा बैठकीत सादर करण्यात यावा.

## नगर विकास विभाग

राज्यामध्ये महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषदा एकूण २५२ आहेत. प्रत्येक नगर पालिकेला २ हजार आणि महानगर पालिकेला १० हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट दिल्यास, ६.८ लाख इतकी वृक्ष लागवड होवू शकेल. नगर विकास विभागाने प्रत्येक महानगर पालिका / नगर पालिकानिहाय उद्दिष्ट निश्चित करावे.

## जलसंपदा विभाग

सिंचन विभागाकडे उपलब्ध असलेली गाळपेराची जमीन, धरणाखाली भूसंपादन झालेली शिल्लक जमीन, कालवे आणि सिंचन विभागाच्या वसाहती येथेही वृक्ष लागवड करण्यास वाव आहे. या सर्व उपलब्ध क्षेत्राचा विचार करुन सचिव, जलसंपदा विभाग यांनी अधिक्षक अभियंता मंडळ निहाय उद्दिष्ट निश्चित करण्यात यावे.

इतर विभाग.

याव्यतिरिक्त इतर विभागांनाही वृक्षारोपण कार्यक्रमामध्ये सहभागी करणे आवश्यक आहे. यास्तव, संबंधित विभागाच्या सचिवांनी त्यांचे स्तरावर आढावा घेवून स्वत:हून उद्दिष्ट ठरवून तसे मुख्य सचिवांना कळविण्यात यावे.

कार्यक्रम आयोजन, संनियंत्रण व समग्र कार्यपध्दती.

शासन निर्णय, क्रमांक एफडीएम-२००५/प्र.क्र.१२५/फ-२, दिनांक २२ नोव्हेंबर,२००५ अन्वये राष्ट्रीय वन निती,१९९८ च्या धोरणानुसार गठीत करण्यात आलेल्या मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समिती या कार्यक्रमाचे संनियंत्रण करील. या समितीची बैठक दर पंधरा दिवसांनी घेण्यात येईल आणि त्यामध्ये व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे विभागवार उद्दिष्टांचा आढावा घेतला जाईल.

जिल्हा पातळीवर नियोजन.

जिल्हा पातळीवर सदर कार्यक्रमाचे नियोजन, निधीची उपलब्धता, येणाऱ्या अडचणी दूर करण्याकरिता व उद्दिष्ट पूर्तीची जबाबदारी पार पाडण्याकरिता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सह-अध्यक्ष |
| अधिक्षक अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य |
| उपसंचालक, सामाजिक वनीकरण | सदस्य |
| व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य |
| जिल्हा कृषी अधिक्षक | सदस्य |
| जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) | सदस्य |
| प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास प्रकल्प | सदस्य |
| जेष्ठ उप-वनसंरक्षक | सदस्य सचिव |

सदर समितीची बैठक दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी जिल्हाधिकारी घेतील. या बैठकीमध्ये विभागवार दिलेल्या उद्दिष्टांच्या आढावा, उद्दिष्ट पूर्ती करण्याकरिता रोपांच्या उपलब्धतेचा आढावा, रोपे पुरेशी उपलब्ध नसल्यास, स्थानिक नियोजन करुन प्रश्न सोडविण्याची कार्यवाही, रोजगार हमी योजनेमधून घेण्यात येणाऱ्या वृक्ष लागवडीची प्रशासकीय मान्यता वेळेवर मिळविणे व प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर निधी उपलब्ध असल्याबाबतचा आढावा घेणे, मजूरांच्या मजूरीचे वाटप वेळेवर होते की नाही, याचीही तपासणी, इत्यादी बाबींचा आढावा घेतला जाईल.

सदरच्या समितीच्या कामाचे संनियंत्रण करण्याकारिता विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येत आहे. या समितीमध्ये अपर आयुक्त (आदिवासी विकास), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), सह-संचालक (उद्योग), उप-संचालक (शिक्षण) हे सदस्य राहतील. ही विभागीय समिती दर महिन्याला प्रत्येक जिल्ह्याचा जिल्हावार आढावा घेवून, तेथील दौरे आयोजित करुन, प्रत्यक्ष कामाची पाहणी करु शकेल.

राज्य पातळीवर एम.आय.एस. (Management Information System)

एम.आय.एस. (Management Information System) चे ऑन लाईन संगणकीकरण करण्यात आलेले आहे. त्यांचे मुख्यालय मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, ठाणे हे केंद्रबिंदू राहील. त्यांनी एम.आय.एस. चा संबंधित संकलित माहिती जिल्हावार व विभागनिहाय अद्ययावत करण्यात यावा. हा माहिती नियंत्रण कक्ष, मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण यांच्या नियंत्रणाखाली राहणार आहे. यासाठी विकसित करण्यात आलेले सॉफ्टवेअर त्यांनी सर्व विभागांना उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. याआधारे दरमहा प्राप्त होणारा अहवाल सर्व विभागाचे सचिव, प्रधान सचिव आणि अपर मुख्य सचिव यांनी मुख्य सचिवांना यांना सादर करावयाचा आहे. प्रधान सचिव (जलसंधारण) यांचे नियंत्रणाखाली मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, ठाणे हे काम करतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

संगणक संकेतांक - 201111807303400l

( रत्नाकर गायकवाड )
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव.
(२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
(३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
(४) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग.
(५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
(६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्य जीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
(७) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
(८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर.
(९) प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा महासंचालक, सामाजिक वनीकरण, पुणे.
(१०) सर्व विभागीय आयुक्त.
(११) सर्व जिल्हाधिकारी.
(१२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
(१३) सर्व महानगर पालिकांचे आयुक्त.
(१४) सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक / मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक.
(१५) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
(१६) आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
(१७) संचालक, नगर पालिका संचालनालय, मुंबई.
(१८) संचालक (फलोत्पादन), महाराष्ट्र राज्य, पुणे.
(१९) संचालक (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
(२०) संचालक (उच्च व तंत्र शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(२१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर.
(२२) महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर.
(२३) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
(२४) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक.
(२५) वन विभागातील सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / विशेष कार्य अधिकारी.
(२६) निवड नस्ती (कार्यासन फ-२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासन परिपत्रक क्रमांक एफडीएम-२०११/प्र.क्र.१०४/फ-२, दिनांक २५ ऑक्टोबर,२०११ चे

## परिशिष्ट-१

## महाराष्ट्र राज्याचे १०० कोटी वृक्ष लागवड योजनेचे जिल्हानिहाय उद्दिष्ट.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | ग्राम पंचायतींची एकूण संख्या | सन २०१२-१३ साठीचे लक्ष्य (जिल्हा परिषद) (कृषी व शिक्षण सह) | इतर विभाग (वन, उद्योग, सार्वजनिक बांधकाम व सिंचन, इत्यादी.) |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | ९३७ | १८७४0000 | १४१७0000 |
| २ | रायगड | ८२१ | १६४२0000 | १३३00000 |
| ३ | रत्नागिरी | ८५१ | १७०२0000 | १३७८0000 |
| ४ | सिंधुदूर्ग | ४३१ | ८६२0000 | ६९८0000 |
| ५ | नाशिक | १३८२ | २७६४0000 | २१३८0000 |
| ६ | धुळे | ५५१ | ११०२0000 | ८९२0000 |
| ७ | नंदूरबार | ५०१ | १००२0000 | ८११0000 |
| ८ | जळगांव | ११५१ | २३०२0000 | १८०४0000 |
| ९ | अहमदनगर | १३१५ | २६३00000 | २०३00000 |
| १० | पुणे | १४०७ | २८१४0000 | २१७९0000 |
| ११ | सातारा | १५०९ | ३०१८0000 | २३४४0000 |
| १२ | सांगली | ७०५ | १४१00000 | ११४२0000 |
| १३ | सोलापूर | १०२८ | २०५६0000 | १५६५0000 |
| १४ | कोल्हापूर | १०२८ | २०५६0000 | १५६५0000 |
| १५ | औरंगाबाद | ८५८ | १७१६0000 | १३८९0000 |
| १६ | जालना | ७८१ | १५६२0000 | १२६५0000 |
| १७ | परभणी | ७०४ | १४०८0000 | ११४00000 |
| १८ | हिंगोली | ५६५ | ११३00000 | ९१५0000 |
| १९ | बीड | १०१९ | २०३८0000 | १५५५0000 |
| २० | नांदेड | १३११ | २६२२0000 | २०२३0000 |
| २१ | उस्मानाबाद | ६२१ | १२४२0000 | १००६0000 |
| २२ | लातूर | ७८७ | १५७४0000 | १२७४0000 |
| २३ | अमरावती | ८४३ | १६८६0000 | १३६५0000 |
| २४ | अकोला | ५४२ | १०८४0000 | ८७८0000 |
| २५ | यवतमाळ | १२०८ | २४१६0000 | १८५६0000 |
| २६ | बुलडाणा | ८६७ | १७३४0000 | १४०४0000 |
| २७ | वाशिम | ४९३ | ९८६0000 | ७९८0000 |
| २८ | नागपूर | ७७६ | १५५२0000 | १२५७0000 |
| २९ | वर्धा | ५१७ | १०३४0000 | ८३७0000 |
| ३० | भंडारा | ५४१ | १०८२0000 | ८७६0000 |
| ३१ | गोंदिया | ५५६ | १११२0000 | ९०१0000 |
| ३२ | चंद्रपूर | ८४७ | १६९४0000 | १३७२0000 |
| ३३ | गडचिरोली | ४६७ | ९३४0000 | ७५६0000 |
| | एकूण | २७९२० | ५५८४00000 | ४४१६00000 |

एकूण:- १000000000 वृक्ष